# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 12.07.2025 वार- शनिवार

---

**रोजगार**

रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याची दिशा मिळते आहे. रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात सरकार केवळ आश्वासनांपुरतं मर्यादित राहात नाही, तर प्रत्यक्षात कृतीच्या माध्यमातून परिवर्तन घडवत आहे असं प्रतिपादन नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्यानं नियुक्त झालेल्या 51 हजारांहून अधिक युवकांना सोळाव्या रोजगार मेळ्यात नियुक्ती पत्रं वितरित केली. त्यावेळी पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 25 जणांना प्रातिनिधिक नियुक्तीपत्रं देण्यात आली. राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, रेल्वेचे पुणे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा याप्रसंगी उपस्थित होते.

एकंदर दोनशे उमेदवारांना टपाल खातं, रेल्वे, सीआयएसएफ, बँकांसहित विविध केंद्र सरकारी कार्यालयांत सेवेची ही नियुक्तीपत्रं देण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक नियुक्तीपत्रं रेल्वे खात्याची होती. या नियुक्तींमध्ये महिला, दिव्यांग आणि दुर्गम भागातील उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात आलं आहे.

**विमान**

अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत आलेल्या प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. याची सखोल चौकशी करून अंतिम अहवाल प्राप्त होणार आहे, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बातमीदारांना पुण्यात सांगितलं. ब्लॅक बॉक्स तपासणीची प्रक्रिया आता देशातच होत असल्याचं ते म्हणाले.

**एएफएमसी**

पुण्यातील सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या वैद्यकीय कॅडेट्सचा सेवारंभ सोहळा आज मोठ्या उत्साहात पार पडला. पाच कॅडेट्सपैकी एक भारतीय वायु दलात आणि चार जणांना भारतीय सैन्यात कमिशन देण्यात आले आहे. याप्रसंगी ज्येष्ठ मान्यवर, माजी सैनिक, प्राध्यापक आणि पालक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

सशस्त्र सेना वैद्यकीय सेवा महासंचालक सर्जन व्हाइस ॲडमिरल आरती सरीन यांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांचं अभिनंदन केले आणि देशसेवा तसंच समर्पणाच्या कारकिर्दीत यश आणि परिपूर्णतेसाठी शुभेच्छा दिल्या.

**हरित**

पर्यावरणपूरक आणि कार्बन उत्सर्जनमुक्त वाहतुकीसाठी शासन 'ग्रीन मोबिलिटी'च्या दिशेनं ठोस पावलं उचलत असल्याची माहिती परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज पुण्यात दिली. शिक्षण प्रसारक मंडळी आणि निरामय या संस्थेच्या वतीनं 115 विद्यार्थिनींना मिसाळ यांच्या हस्ते मोफत सायकलींचं वाटप करण्यात आलं. ग्रीन मोबिलिटीसाठी सायकलिंग, सार्वजनिक वाहतुकीसाठी मेट्रोसारखे प्रकल्प, ई बसेसची खरेदी आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला शासन प्राधान्य देत असल्याचं त्या म्हणाल्या.

**संप**

राज्य सरकारनं होमिओपॅथी डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील नोंदणी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. नोंदणीबाबत निर्णय घेण्यासाठी सरकारनं एक अभ्यास समिती नेमल्यामुळं आयएमएच्या पुणे शाखेनं आपला संप मागे घेतला. या निर्णयामुळं ॲलोपॅथी आणि होमिओपॅथी डॉक्टरांच्या दरम्यान वाद निर्माण झाला होता.

**कर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं मालमत्ता कर थकविणाऱ्या मालमत्ताधारकांना नोटीस पाठवली आहे. तसंच, अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. थकबाकीदार मालमत्तांची नळ जोडणी खंडित करण्यात येणार आहे. शहरात ५० हजार रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असणारे २५,१३० मालमत्ताधारक आहेत, तर ५ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेले ७८४ मालमत्ताधारक आहेत.

**पाडकाम**

पिपंरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं सुरु असलेल्या अनधिकृत बांधकाम विरोधी मोहीमेत रहाटणी इथल्या नखाते वस्तीमध्ये अंदाजे १२०० चौरस फूट बांधकामांवर कारवाई करण्यात आली.

आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार तसंच अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. त्यावेळी मोठा फौजफाटा उपस्थित होता.

**क्रिडा**

यंदाच्या शासकीय जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. स्पर्धेत ९३ खेळांचा समावेश आहे. स्पर्धेचे बदलते नियम आणि मार्गदर्शक तत्वांबाबत शिक्षकांनी सजग राहण्याची गरज असल्याचं पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी नियोजन बैठकीत नुकतंच सांगितलं. या बैठकीत जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पुणे आणि परिसरात आज दिवसभर सूर्यदर्शन झालं. उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाची हलकी सर पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. कमाल तापमान 30 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**